# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 03/01/2023 (मंगळवार) दुपार

---

### चोरीचा प्रयत्न

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १८ किमी अंतरावर मोहपा येथे दिनांक ०२/०१/२०२३ चे ०२.०० वा. ते ०२.१५ वा. चे दरम्यान फिर्यादी नामे– सूरेश महादेवराव टेकाडे, वय ५४ वर्ष, रा. मोठे पिल्कापार कळमेश्वर यांचे मोहपा येथे बस स्टॉपवर प्लॉट असून घर आहे. घरासमोर दोन शटर आहे. दोन्ही शटर फिर्यादीने किरायाने दिले आहे. एक शटर इंडीया बॅंकला अंदाजे ०६ वर्षा अगोदर ए. टी. एम. करीता ४०००/– रू. महीन्याने किरायाने दिले आहे. दिनांक ०२/०१/२०२३ रोजी फिर्यादी हे रात्री पिल्कापार येथे घरी आराम करीत होते. तेव्हा रात्री अंदाजे ०३.३० वा. दरम्यान मोहपा बस स्टॉप वरील हॉटेल मालक नामे– नारायण मारोतकर यांनी फोन करून सांगितले की, तूमचे मोहपा येथील किरायाने दिलेले रूम मधिल ए. टी. एम. कोणीतरी चोराने रात्री अंदाजे ०२.०० ते ०२.१५ वा. दरम्यान फोडण्याचा प्रयन्त केला आहे. यावरून फिर्यादी मोटार सायकलने पिल्कापार येथून मोहपा येथे आले व ए. टी. एम. ची पाहणी केली तर फिर्यादीचे किरायाने दिलेले इंडीया बॅंकेचे ए. टी. एम. चे शटर अर्धवट उघडे व आतमध्ये लावलेले कॅमेरावर काळया रंगाचा पेन्ट मारलेला तसेच ए. टी. एम. बटनवर तसेच उजवे बाजूचे गॅस कटर सारखे कटरने छिद्र पाडल्या सारखे फिर्यादीला दिसले. कोणत्याही प्रकारे ए. टी. एम. तूटफूट झालेले नाही. कोणीतरी अज्ञात चोराने ए. टी. एम. फोडण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक आसिफ शेख मो. क्र. ८४०८८०६६९० हे करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील सुमित लॉज सावनेर, सावनेर येथे दिनांक ०१/०१/२०१८ चे २०.०० वा. ते दिनांक २३/०८/२०२२ चे ००.०० वा. चे सुमारास यातील फिर्यादी/पिडीत मुलगी व आरोपी हे मित्र मैत्रीण असून त्यांची ओळख सन २०१८ मधे झाली होती नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी नामे– मनोज मनोहर भुरे, रा. पेंढरी निंबा, पारशिवनी जि. नागपुर याने मोटर सायकल क्र. एम एच ४० बी. एस. ८६०५ वर बसवून सुमित लॉज सावनेर येथे नेऊन लॉज चे रूम मधे पान खाण्याकरीता देऊन पिडीतेशी शारीरीक संबंध केले व होश आल्यावर पिडीतेने शारीरीक संबंध का केले म्हणून म्हटले असता आरोपीने ''मी तुझासोबत लग्न करतो'' असे म्हटले त्यानंतर आरोपीने वेळोवेळी लग्नाचे आमिश दाखवून वेगवेगळया ठिकाणी लॉजवर नेऊन शारीरीक संबंध केले व आता लग्न करण्यास नकार देत असुन ''तुला जे करायचे आहे ते तू कर'' असे म्हणत आहे. अशा फिर्यादीच्या तोंडी रीपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६(२) (जे), ३७६(२) (एन), ३२८ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मारूती मुळुक पो. स्टे. सावनेर मो. नं. ९५५२५६४०४७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर